# राज्य कुटुंब कल्याण कार्यालय, पुणे
## महाराष्ट्र राज्य

| | | |
|---|---|---|
| अतिरिक्त संचालक<br>दूरध्वनी क्रमांक (वै) -<br>कार्यालय दूरध्वनी क्र. - | २६०५८९९६ (वै)<br><br>२६०५८७३९ (का)<br>२६०५८१३९ (का)<br>२६०५८४७६ (का) | कुटुंब कल्याण भवन, राजाबहादूर मिलरोड, रेल्वेस्टेशनच्या मागे, पुणे ४११ ००१. फॅक्स नं.- ०२० - २६०५८७६६ / २६०५८२१८ / २६०५८१०९<br>Email ID : pulsepolio@gmail.com/mahacoldchain@gmail.com<br>Website : arogya.maharashtra.gov.in |
| **आरोग्य सेवा** | | जा.क्र.राकुकका/कक्ष-१२/नियमित लसीकरण/ आयपीव्ही/ मार्गदर्शक सूचना/ 11774-879 /१६<br>दिनांक :- /14/3/2016 |

प्रति,

जिल्हा आरोग्य अधिकारी , जिल्हा परिषद, ..... (सर्व)
जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी, ..... (सर्व)
वैद्यकिय आरोग्य अधिकारी, महानगरपालिका , ..... (सर्व)

विषय - आयपीव्ही लसीच्या सुधारित मार्गदर्शक सूचना
संदर्भ - केंद्रशासनाच्या सुधारित मार्गदर्शक सूचना पत्र दिनांक ४ मार्च १६

केंद्रशासनाच्या मार्गदर्शक सूचनांनसार लवकरच राज्यात आयपीव्ही लसींचा वापर नियमित लसीकरण कार्यक्रमात करण्यात येणार आहे.

उपरोक्त संदर्भांकिंत विषयान्वये, आयपीव्ही लस वापराबाबत प्राप्त झालेल्या सुधारित सूचना त्या पुढीलप्रमाणे -

- आयपीव्ही लस (५ मि.ली.) - ०.१ मि.ली. प्रति डोस
- प्रत्येक लाभार्थ्याला ६ आठवडे व १४ आठवडे या वयोगटात ०.१ मि.ली. प्रति डोस या प्रमाणे लसीचे २ डोस देण्यात यावेत.
- ही लस उजव्या हातावर, त्वचेमध्ये (Intradermal) देण्यात यावी.
- ही लस देतांना, बीसीजी लस देण्याकरिता वापरण्यात येणा-या सिरिंजचा वापर करण्यात यावा.

सदर सूचनांनुसार आपल्या अधिनस्त सर्व आरोग्य संस्थांमधील सर्व क्षेत्रिय कर्मचा-यांमार्फत आयपीव्ही लस देण्याबाबतची कार्यवाही करण्याकरिता सर्वस्तरीय कार्यशाळांमध्ये सूचना देण्यात याव्यात व विहित केलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार लसीकरण केले जाईल याची दक्षता घ्यावी.

अतिरिक्त संचालक,आरोग्य सेवा,
कुटुंब कल्याण, माता बाल संगोपन व शालेय आरोग्य पुणे.

प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी -
उपसंचालक आरोग्य सेवा , मंडळ..... (सर्व)

प्रत सविनय सादर:-

- मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, गो.ते.रुग्णालय अवार, मंत्रालय, मुंबई.
- मा.आयुक्त (कु.क) तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोगय अभियान मुंबई.
- मा.संचालक आरोग्य सेवा, संचालनालय, मंबई १

# गर्भवती महिला,अर्भक व लहान बालकांसाठी राष्ट्रीय लसीकरण वेळापत्रक

| लस | कधी द्यावे | मात्रा | मार्ग | जागा |
|---|---|---|---|---|
| **गर्भवती महिलांसाठी** | | | | |
| टी.टी-१ | गरोदरपणाच्या सुरुवातीला | ०.५ मि.ली. | अंत:स्नायुत | दंडाच्या वरच्या बाजूला |
| टी.टी - २ * | टी.टी. दिल्यानंतर ४ आठवडयांनी | ०.५ मि.ली. | अंत:स्नायुत | दंडाच्या वरच्या बाजूला |
| टी.टी - बूस्टर | जर मागील टी.टी. दिल्यानंतर ३ वर्षाच्या आंत गरोदर राहिल्यास | ०.५ मि.ली. | अंत:स्नायुत | दंडाच्या वरच्या बाजूला |
| **अर्भकांसाठी** | | | | |
| बी.सी.जी. | जन्मत:/शक्य तितक्या लवकर/एक वर्ष पूर्ण होण्याआधी | ०.१ मि.ली.( १ महिना आंतील बालकांना ०.०५ मि.ली). | त्वचेमध्ये (अंत:त्वचा) | डाव्या दंडाच्या वरच्या बाजूला |
| हिपॅटायटीस् - बी.जन्मत: | जन्मल्यानंतर २४ तासाचे आंत | ०.५ मि.ली. | अंत:स्नायुत | डाव्या मांडीच्या मध्य भागी बाहेरील बाजूला |
| ओ.पी.व्ही. झिरो डोस | जन्मत:/शक्य तितक्या लवकर/१५ दिवसापर्यंत | २ थेंब | तोंडावाटे | तोंडावाटे |
| ओ.पी.व्ही.१, २ व ३ | जन्मल्यानंतर ६, १० व १४ वा आठवडा पूर्ण झाल्यावर | २ थेंब | तोंडावाटे | तोंडावाटे |
| पेंटाव्हॅलंट १, २ व ३ | जन्मल्यानंतर ६, १० व १४ वा आठवडा पूर्ण झाल्यावर | ०.५ मि.ली. | अंत:स्नायुत | डाव्या मांडीच्या मध्य भागी बाहेरील बाजूला |
| आय.पी.व्ही. | जन्मल्यानंतर ६ व १४ वा आठवडा पूर्ण झाल्यावर - ओ.पी.व्ही.१ व ३ च्या डोस सोबत एक वर्ष पूर्ण होण्याआधी | ०.१ मि.ली. | त्वचेमध्ये (अंत:त्वचा) | उजव्या दंडावर |
| गोवर - १ | जन्मल्यानंतर ९ महिने पूर्ण झाल्यावर | ०.५ मि.ली. | अध:त्वचेत | उजव्या दंडाच्या वरच्या बाजूला |
| जीवनसत्व - अ-१ | जन्मल्यानंतर ९ महिने पूर्ण झाल्यावर/गोवर लसी सोबत | १ मि.ली. (१ आय.यु) | तोंडावाटे | तोंडावाटे |
| जे.ई. - १ ** | जन्मल्यानंतर ९ महिने ते १२ महिने | ०.५ मि.ली. | अध:त्वचेत | डाव्या दंडाच्या वरच्या बाजूला |
| **बालकांसाठी** | | | | |
| डी.पी.टी.बूस्टर - १ | १६ ते २४ महिने | ०.५ मि.ली. | अंत:स्नायुत | डाव्या मांडीच्या मध्य भागी बाहेरील बाजूला |
| ओ.पी.व्ही.बूस्टर | १६ ते २४ महिने | २ थेंब | तोंडावाटे | तोंडावाटे |
| गोवर - २ | १६ ते २४ महिने | ०.५ मि.ली. | अध:त्वचेत | उजव्या दंडाच्या वरच्या बाजूला |
| जे.ई. - २ ** | १६ ते २४ महिने | ०.५ मि.ली. | अध:त्वचेत | डाव्या दंडाच्या वरच्या बाजूला |
| जिवनसत्व अ २ ते ९ *** | १६ महिने व नंतर प्रत्येक सहा - सहा महिन्यांनी ५ वर्ष पूर्ण होई पर्यंत | २ मि.ली. (२ आय.यु) | तोंडावाटे | तोंडावाटे |
| डी.पी.टी.बूस्टर - २ | ५ ते ६ वर्ष | ०.५ मि.ली. | अंत:स्नायुत | दंडाच्या वरच्या बाजूला |
| टी.टी. | १० व १६ वर्ष | ०.५ मि.ली. | अंत:स्नायुत | दंडाच्या वरच्या बाजूला |

* : प्रसूतीच्या ३६ आठवडयापूर्वी टी.टी.२ अथवा बूस्टर डोस द्यावा. आधी दिला नसल्यास ३६ आठवडयानंतर सुध्दा द्यावा. गरोदरपणात टी.टी. चे इंजेक्शन दिले नसल्यास प्रसूतीच्या वेळेस द्यावे.

** : निवडक जिल्हयांमध्ये देण्यात येते.

*** : एकात्मिक बाल विकास योजनेनूसार जीवनसत्व अ चा दुसरा ते नववा डोस १ ते ५ वर्ष वयोगटातील बालकांना वर्षातून दोनदा विशेष फेरीत द्यावी.